किमत शंभर रुपये प्रमाणे ३ हजार रुपये, तसेच पाच लिटरच्या प्लास्टिक कॅन मध्ये ४० लिटर हातभट्टीची दारू किंमत ४ हजार हजार रुपये, तीन लोखंडी टिपे किंमत १५० रूपये, दोन

आले आहे सदरची कारवाई ... निचळ यांचे मार्गदर्शनात पोलीस नाईक शेख इरफान पोलीस कॉन्स्टेबल प्रफुल्ल डब्बे व पोलीस कॉन्स्टेबल संदीप रिंढे यांनी केली

महासागर दि- २४/०५/२०२५ शनिवार

# शासकीय अध्यापक महाविद्यालय, बुलडाणा

## निविदा सन २०२५-२६

शासकीय अध्यापक महाविद्यालय, बुलडाणा या शासकीय महाविद्यालया करीता सन-२०२५-२६ या वर्षाकरीता स्वच्छक/ सफाई कामगार 0१ पद व सुरक्षा गार्ड/पहारेकरी 0१ पद असे एकुण 0२ पदे कंत्राटी सेवा पध्दतीने प्रचलित नियमानुसार अटी व शर्तीच्या अधीन राहून कंत्राटी सेवा पध्दतीने पदे भरावयाची आहेत. तरी शासनमान्य कंत्राटदार/पंजीकृत बेरोजगार सेवा सहकारी सेवा संस्था/लोकसेवा केंद्राकडून व्दिलिफाफा पध्दतीने मोहोरबद निविदा मागविण्यात येत आहे. महाविद्यालयाकडे प्रति शेडयुल रू.५००/- चा भरणा करून दि.२३.०५.२०२५ ते २७.०५.२०२५ पर्यंत सकाळी ११.०० ते सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत (शनिवार व रविवार वगळता) मिळू शकतील व २९/०५/२०२५ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत मोहोबंद व्दिप्रतीत निविदा स्विकारण्यात येतील. तसेच मोहोरबंद निविदा दिनांक. ३०.०५.२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता प्राचार्याचे दालनात उघडण्यात येतील त्यावेळेस संबंधित निविदा धारकांनी प्राचार्याचे दालनात दपारी १२.०० वाजता उपस्थित राहावे. सदर प्रकरणी अंतिम निर्णय प्राचार्य यांचा राहील. सदर निविदा व सविस्तर माहिती महाविद्यालयाचे संकेतस्थळावर पाहावी.

टीप:- वरील कंत्राटी सेवा पध्दतीने नियुक्त करावयाचे पदे केवळ सत्र २०२५-२६ साठीच राहील. सदर कंत्राटी सेवा पध्दतीने नियुक्त करावयाच्या पदांना नियुक्ती झाल्यानंतरच अनुदान उपलब्धतेनुसारच मानधन देय होईल. याबाबतचा सर्व अंतिम निर्णय प्राचार्य, शासकीय अध्यापक महाविद्यालय, बुलडाणा यांचा राहील.

महाविद्यालयाचे संकेतस्थळ: www.gcbedbuldana.org.in वर सविस्तर माहिती प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

(डॉ.एन.बी. चव्हाण)
प्र. प्राचार्य,
शासकीय अध्यापक महाविद्यालय,
बुलडाणा

विमाका/अम/जाही/१७१/२०२५-२६